महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक :- पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तीन दिनांक :- ६ जुलै, २०१८

# घोषणा

**विषय**:- आयोगामार्फत आयोजित **विविध चाळणी परीक्षांकरीता** विकलांग उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत.

आयोगामार्फत आयोजित स्पर्धा/चाळणी परीक्षांकरीता परीक्षेच्या वेळी उमेदवारांना लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्यासंबंधी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १ मार्च, २०१८ रोजी ‘विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधीबाबत मार्गदर्शक सूचना’ उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर मार्गदर्शक सूचनांनुसार विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज करुन आयोगाची पूर्व परवानगी घेतलेल्या उमेदवारांनाच परीक्षेच्या वेळी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील, असे आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेद्वारे स्पष्ट करण्यात आले आले आहे.

**२.** आयोगामार्फत आयोजित सर्व चाळणी परीक्षांकरीता लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्याबाबत संबंधित कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये लेखी विनंती न करता केवळ संबंधित परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील दाव्याच्या आधारे लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही. तसेच, परीक्षेच्या ऑनलाईन अर्जामध्ये दावा न करता केवळ लेखी विनंती केल्यास असा विनंती अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**३.** लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधीबाबत ऑनलाईन अर्जामध्ये स्पष्ट दावा केल्यानंतर विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) अर्ज करुन त्यासोबत संबंधित सर्व कागदपत्रे सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह सादर करणे अनिवार्य आहे. आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी न घेतल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही, याची संबंधित सर्व उमेदवारांनी जाणिवपूर्वक नोंद घ्यावी.

**४.** सदर सूचनांची यापुढील सर्व चाळणी परीक्षांकरीता काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:- मुंबई

TRIAL MODE − a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.